# जिल्हा परिषद अमरावती

अत्यंत महत्वाचे /ईमेलव्दारे

क्रमांक - जिप/मुकाअ/स्विस/ ११६ /१६
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,
दिनांक - ७ सप्टेबर, २०१६ १४

प्रति,
खाते प्रमुख, सर्व,
जिल्हा परिषद अमरावती.

विषय - मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिनांक ७ सप्टेबर २०१६रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसोबत झालेल्या बैठकीचे अनुषंगाने दिलेल्या सूचनांप्रमाणे करावयाची कार्यवाही..

मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिनांक ७ सप्टेबर २०१६रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सोबत झालेल्या बैठकीचे अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेस्तव सूचना दिलेल्या आहेत.

१. नजिकच्या काळात अमरावती जिल्हयात विधानषरिषद पदविधर मतदार संघ आणि जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीकरिता आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने मंजुर कामांची अंदाजपत्रके तयार करुन निविदा प्रक्रिया पूर्ण करावी व त्यास सक्षम प्राधीकरणाची प्रशासकीय मान्यता घेवून तातडीने कार्यारंभ आदेश देण्यात यावेत. सदरची कामे ऑक्टोबर २०१६ पूर्वी सुरु होतील याची दक्षता घ्यावी.

२. आचारसंहितेमुळे लाभार्थी लाभांपासून वंचित राहणार नाहीत तसेच निधी अखर्चित राहणार नाही याची खात्री करावी.

३. लोकायुक्तांकडील प्रकरणे वेळीच निकाली काढणे आवश्यक आहेत. परंतु कार्यालय प्रमुखांकडून योग्य ती दखल घेत नसल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबत मा. विभागीय आयुक्त यांनी सुध्दा नाराजी व्यक्त केलेली असून, लोकायुक्तांकडील प्रकरणे त्यांचेकडील सुनावणीपूर्वी निकाली निघतील याबाबत व्यक्तीशः लक्ष द्यावे. येणा-या आठवडी सभेत याबाबतचा गोषवारा सादर करावा.

४. शासनाच्या / जिल्हा परिषदेच्या विविध योजनां- कार्यक्रम, उपक्रम जि.प. हाती घेण्यात आलेले आहेत, त्याबाबतची प्रगतीपथावरील माहिती तसेच काही यशोगाथा असतील तर अश्या माहितीस वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यासाठी एक प्रेसनोट तयार करुन जि.प. मुख्यालयाच्या माहिती व तंत्रज्ञान कक्षास (I.T. Cell) दरमहा न चुकता पाठवावयाची आहे. सदरची माहिती कोणत्या तारखेस पाठवावी लागेल याबाबतची तारीख आणि वेळापत्रक I.T. Cell कडून आपणास दूरध्वनीव्दारे किंवा ई-मेलव्दारे कळविण्यात येईल.

शुभेच्छासह.

(डॉ. किरण कुलकर्णी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

प्रतिलिपी - **अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अमरावती यांनी माहितीस अग्रेषित.**